वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सारथी
शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती

बालचित्रवाणी इमारत , गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| Email ID : sarthipune@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502 |
|---|---|---|---|

जा.क्र.सारथी/आस्थापना/सा.न्या.से.नि. जाहिरात चौथी वेळ/२०२२-२३/3080 दिनांक:- ०७/०२/२०२३

**सारथी संस्था, पुणे येथे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गीय सेवेमधून शासकीय / निमशासकीय सेवा निवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा "करार पद्धती"ने सारथी संस्थेस घेणेबाबत...**

सारथी संस्था, पुणे येथे सामान्य प्रशासन विभाग कडील, निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांचेकडून खालील **कार्यकारी अधिकारी (सामाजिक न्याय)** या पदाकरिता करार पद्धतीने निवड करण्यासाठी **दिनांक २१/०२/२०२३** रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यापूर्वी ज्या उमेदवारांनी खालील पदांसाठी अर्ज केले होते त्यांनी सुद्धा पुन्हा एकदा ऑनलाईन अर्ज करावेत:-

**करार पद्धतीने घेण्यात येणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांची पात्रता, संवर्ग, पद संख्या व कर्तव्ये-जबाबदाऱ्या यांचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| अ. क्र. | पदनाम | पात्रता | पद संख्या | कर्तव्ये व जबाबदाऱ्या | अनुज्ञेय पारिश्रामिक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | कार्यकारी अधिकारी (सामाजिक न्याय) | **महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत सेवानिवृत्त गट अ किंवा गट ब संवर्गातील राजपत्रित अधिकारी** | १ | १) लक्षित गटातील उमेदवारांसाठी समाज कल्याण अंतर्गत योजनांची प्रभावी अमंलबजावणी करणे.<br>२) नियोजनाप्रमाणे व वेळापत्रकाप्रमाणे संबंधित प्रकल्पातील / योजनेतील / उपक्रमातील कामाची प्रभावी अंमलबजावणी करणे.<br>३) समाज कल्याण विभाग अंतर्गत संस्थेच्या उद्दिष्टानुसार नवीन, नवीन योजना राबविण्यासाठी प्रारूप आराखडे तयार करणे व ते सादर करणे.<br>४) व्यवस्थापकीय संचालक यांनी नेमून दिलेली सर्व कार्यालयीन कामे करणे. | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण — २७१५ / प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ चे शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पारिश्रामिक देय राहील. |

**उपरोक्त पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराने सारथी संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज केल्यानंतर आवश्यक कागदपत्रांचा एक झेरोक्स प्रतीचा संच सारथी कार्यालय, पुणे येथे दिनांक २४/०२/२०२३ रोजी पर्यंत समक्ष किंवा स्पीड पोस्टाने सादर करावे.** ऑनलाईन अर्ज केल्यानंतरच आवश्यक कागदपत्रांचा झेरॉक्स प्रतीचा संच कार्यालयास सादर करावा, ऑनलाईन अर्ज न करता कार्यालयात कागदपत्रे सादर केल्यास तसे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. यापूर्वी ज्या उमेदवारांनी ऑनलाईन

अर्ज केल्यानंतर कागदपत्रे सारथी कार्यालयात सादर केली आहेत त्यांनी सुद्धा पुनश्च एकदा ऑनलाईन अर्ज करून आवश्यक कागदपत्रांचा एक झेरॉक्स प्रतीचा संच सारथी कार्यालय, पुणे येथे सादर करावा.

❖ **अटी व शर्ती:-**

१. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त ११ महिन्यासाठी देण्यात येईल. आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

२. सेवा निवृत्ती झाल्याचे महालेखापाल यांचे सेवा निवृत्ती प्रदान आदेश (PPO) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. कार्यलय प्रमुखांचा सेवा निवृत्ती कार्यमुक्तीचा आदेश (Relieve Memo) सोबत जोडणे आवश्क आहे.

४. संबंधित करार पद्धतीवर घेण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या मासिक पारिश्रमिकाची व भत्त्याची परिगणना ही सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट अ मधील उदाहरण दाखल प्रमाणे करण्यात येईल.

५. करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसावी.

६. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७. अशा अधिकारी विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसलेबाबत संबंधित विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक.

८. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच इतर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, यांचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात यावा.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

११. अशा अधिकारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. नियुक्त अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेरुन कामाचे मूल्यमापन करतील.

१३. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची निवड करत असताना त्यांची पात्रता, अनुभव विचारात घेऊन कोणत्याही श्रेणीतील उमेदवाराची निवड करण्याचे किंवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांना राहतील.

१४. उपरोक्त १ ते १३ व्यतिरिक्त सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्ती लागू राहतील.

AshokKakade.

**व्यवस्थापकीय संचालक**
**छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व**
**मानव विकास संस्था (सारथी), पुणे.**